# मृत्युच्या कारणांचे वैद्यकीय प्रमाणिकरण (एम.सी.सी.डी.) योजना कायदा

- मृत्युच्या कारणांचे वैद्यकीय प्रमाणिकरण (एम.सी.सी.डी.) योजना केंद्रशासनाच्या जन्म आणि मृत्यू अधिनियम १९६९ च्या कलम १०(२) व १०(३) अन्वये देशात अमलात आली आहे. त्यानुसार मृत व्यक्तिच्या शेवटच्या आजारात ज्या नोंदणिकृत वैद्यकीय व्यावसायीकाने तिच्यावर उपचार केले होते, तो वैद्यकिय व्यवसायीक त्या व्यक्तिच्या मृत्यूनंतर ताबडतोब विहीत नमुन्यात मृत्युचे कारण नमुद करणारे एम.सी.सी.डी. प्रमाणपत्र देईल. सदर योजनेमध्ये मृत व्यक्ती रुग्णालयात मृत पावल्यास नमुना क्र. ४ आणि रुग्णालयेतर मृत्यूसाठी नमुना क्र. ४अ  हे प्रमाणपत्र वैद्यकिय व्यावसायीकाने भरुन देणे बंधनकारक आहे. वरील प्रमाणपत्र संबंधित वैद्यकीय व्यवसायीक विनामुल्य देईल.
- महाराष्ट्र शासनाने केंद्रशासनाच्या जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या अधिन राहून सन २००० साली महाराष्ट्र जन्म व मृत्यू नोंदणी नियम तयार केले. त्यामधील नियम क्र. ७ अन्वये मृत व्यक्तीच्या शेवटच्या आजारात उपचार करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायीकांनी एम.सी.सी.डी. प्रमाणपत्रे (४/४अ) भरुन संबंधित निबंधकाकडे दरमहा ५ तारखेपर्यंत देणे बंधनकारक आहे.
- त्याअन्वये मृत व्यक्तीच्या शेवटच्या आजारात उपचार करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायीकांनी एम.सी.सी.डी. प्रमाणपत्रे भरुन संबंधित निबंधकाकडे दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत देणे बंधनकारक आहे. तसेच नमुना क्र. ४ आणि ४अ संबंधित निबंधकाकडे पाठविणे अपेक्षित आहे.
- निबंधकाने दरमहा आपल्या कार्यक्षेत्रात झालेल्या मृत्युंची एम.सी.सी.डी. प्रमाणपत्रे उपसंचालक, आरोग्य सेवा, आ.मा.जी.आ., पुणे या कार्यालयाकडे प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यत पोहचतील अशा बेताने पाठवावीत.
- दंड -  जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम २३(३) नुसार जो कोणताही वैद्यकीय व्यवसायीक कलम १०  च्या पोटकलम ३ अन्वये प्रमाणपत्र देण्याबाबत उपेक्षा करील किंवा नकार देईल तो आणि जी व्यक्ती असे प्रमाणपत्र सुपूर्द करण्याबाबत उपेक्षा करील किंवा नकार देईल ती व्यक्ती, रुपये ५०/- इतक्या द्रव्य दंडास पात्र होईल.

- कार्यपध्दती (संकलन पध्दती) व अधिकारी व कर्मचारी यांच्या जबाबदारी

| जबाबदार अधिकारी/कर्मचारी | कार्यवाही | कालमर्यादा |
|---|---|---|
| वैद्यकीय महाविद्यालये<br>जिल्हा रुग्णालये<br>ग्रामीण रुग्णालये<br>खाजगी रुग्णालये<br>छावणी मंडळांची रुग्णालये<br>दारुगोळा कारखान्यांची रुग्णालये | निबंधक, जन्म व मृत्यु (म.न.पा./दा.का./छा.मं.) यांचेकडे एम.सी.सी.डी.प्रमाणपत्रे पाठविणे. | दरमहा ५ तारखेपर्यत |
| गावातील प्रा.आ. केंद्रे , गावातील खाजगी दवाखाने | ग्रामसेवकाकडे एम.सी.सी.डी. प्रमाणपत्रे पाठविणे. | दरमहा ५ तारखेपर्यत |
| | ग्रामसेवकाने संकलित केलेली एम.सी.सी.डी. प्रमाणपत्रे गट विकास अधिकारी यांचेकडे पाठविणे. | दरमहा ८ तारखेपर्यंत |
| | गटविकारस अधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी, तथा जिल्हा निबंधक कार्यालयास संकलित केलेली एम.सी.सी.डी. प्रमाणपत्रे पाठविणे. | दरमहा ८ तारखेपर्यंत |
| | जिल्हा आरोग्य अधिकारी, तथा जिल्हा निबंधक यांनी जिल्हयातील संकलित केलेली एमसीसीडी प्रमाणपत्रे उपसंचालक आरोग्य सेवा, आ.मा.जी.आ., पुणे कार्यालयास पाठविणे. | दरमहा १० तारखे पर्यंत |
| नगरपंचायत रुग्णालये<br>नगरपरिषद रुग्णालये<br>नगरपालिका रुग्णालये | मुख्याधिकारी(संबंधित) | दरमहा ५ तारखेपर्यत |
| उपसंचालक आरोग्य सेवा, आ.मा.जी.आ., पुणे | राज्यभरातून प्राप्त एम.सी.सी.डी. प्रमाणपत्रांचे १० तारखेपर्यंत संकलन करणे, त्याचे ICD-10 नुसार कोडींग करणे, त्यानंतर सर्व प्रमाणत्रांची सी.आर.एस. या संगणक प्रणालीमध्ये डाटा एन्ट्री करणे. एम.सी.सी.डी.चा वार्षिक अहवाल तयार करणे. मा. महानिबंधक, जन्म व मृत्यू, नवी दिल्ली यांना विहित वेळेत सादर करणे. | दरवर्षी माहे जुलै अखेर मागील वर्षाचा एम.सी.सी.डी.चा वार्षिक अहवाल केंद्रशासनास सादर करणे. |

## मृत्युच्या कारणांचे वैद्यकीय प्रमाणिकरण (एम.सी.सी.डी.) प्रमाणपत्रांबाबत सूचना

१) प्रमाणपत्रे पाठविताना फक्त मृत्यूच्या कारणांचे वैद्यकीय प्रमाणीकरण प्रमाणपत्राची मूळ प्रतच पाठविण्यात यावी.

२) प्रत्येक महिन्याच्या गठठ्याचे उपरिपत्रावर (Covering letter) नमुना ४ व ४अ प्रमाणपत्रांची एकूण संख्या नमूद करावी.

३) शवविच्छेदनानंतर संबंधित मृत व्यक्तीचे मृत्युच्या कारणाचे वैद्यकीय प्रमाणीकरण प्रमाणपत्र संबंधित डॉक्टरांनी लिहिणे बंधनकारक आहे.

४) जागतिक आरोग्य संघटनेने निर्देशित केलेल्या नमुना क्र.४ व ४अ प्रमाणेच प्रमाणपत्रे असणे आवश्यक आहे. (Portrait) पाठवण्यात यावे (सोबत नमुना). तसेच इतर स्वरुपात (Landscape) पाठविण्यात येऊ नये. (प्रमाणपत्रामध्ये कोणतेही बदल करण्याचे अधिकार आरोग्य संस्थांना नाही. तसेच प्रमाणपत्राची प्रिंट किंवा छपाई करण्यात येणाऱ्या पेपरचा रंग पांढरा असावा शाई काळया रंगाची असावी इतर कोणत्याही कलरचा पेपर प्रमाणपत्रांच्या छपाईसाठी वापरु नये).

५) आजाराचे संक्षिप्तरुप (short form) लिहू नये. उदा. : MI – Myo cardial infarction

६) कोरे अथवा अर्धवट लिहिलेली प्रमाणपत्रे पाठवू नयेत. (कोरे अथवा अर्धवट लिहिलेले प्रमाणपत्रांमुळे या कार्यालयास प्रमाणपत्रांचे छाननी व अभ्यास (ॲनालिसीस) करतांना अडचणी येतात).

७) आजाराचे नाव इंग्रजी मधेच लिहावे व ते इंग्रजीमध्ये मोठया लिपीत (Capital ) मध्ये लिहावे. प्रमाणपत्रातील कोणताही रकाना रिक्त ठेऊ नये.

८) मृत्युचे कारण मराठीतील वैद्यकीय परिभाषेत न लिहिता इंग्रजी परिभाषेत लिहावे.

९) मृत्युचे कारण संदिग्ध व अपूर्ण परिभाषेत (Ill-defined) लिहु नये.

उदा. : Cardio respiratory failure, Respiratory failure, Sanelity etc.

१०) भाग १ मध्ये आजाराचा अ,ब,क आणि ड यांचा क्रम योग्य पध्दतीने लिहावा.

११) एका ओळीवरती एकाच आजाराचे नाव लिहावे.

१२) मृत्यू अपघातामुळे झाला असल्यास इजा झालेल्या अवयवाचा नेमका भाग नमूद करावा.

१३) उपजत मृत्यूसाठी एमसीसीडी प्रमाणपत्रे ४ किंवा ४अ भरु नये.

१४) कोविड मृत्यूसाठी खालीलप्रमाणे **ICD-10 Code** वापरावेत :

**U07.1- Virus identified** आणि

**U07.2- Virus not identified**

**-Clinically epidemiologically diagnosed COVID-19**

**-Probable COVID-19**

**-Suspected COVID-19**

(कृ.मा.प.)

१५) हद्दपार झालेले आजारांचे उदा. पोलिओ हे मृत्युचे कारण म्हणून नमूद करु नये.

१६) संवेदनशील आजार / अतिसंवेदनशील आजार (Diseases under International Health Regulations) हे मृत्यूचे कारण असलेली एमसीसीडी प्रमाणपत्रे पाठवितांना खात्री करुनच प्रमाणपत्रे पाठवावी. (सोबत आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित प्रती पाठवाव्यात).

१७) एमसीसीडी प्रमाणपत्र फक्त डॉक्टरांनीच लिहावयाचे आहे. याबाबत कृपया दक्षता घ्यावी. तसेच, सदर प्रमाणपत्र मृताच्या नातेवाईकां समक्ष किंवा इतर कोणा समक्ष उघड होता कामा नये, प्रमाणपत्रावर नातेवाईक किंवा इतर संबंधित कोणाचीही स्वाक्षरी अथवा अंगठा घेवू नये.

१८) एमसीसीडी प्रमाणपत्रांची कोणत्याही स्वरुपातील दुबार प्रत अस्तित्वात असणार नाही याची काळजी घ्यावी.

१९) कार्यालयाच्या इ मेल आयडीवर प्रमाणपत्रे स्कॅन करुन पाठवू नयेत.

## <u>मृत्युच्या कारणांचे वैद्यकीय प्रमाणिकरण प्रमाणपत्रे (**MCCD**) संकलनाची पध्दत</u>

